
ISSN - 2349 - 0446

निर्भिडता सत्यता यासाठीच पत्रकारिता

# अन्वेषण




2016

डॉ.बाबासाहेब आंबेडकर शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंती सोहळा विशेषांक

# जागर

संपादक : डॉ. सुभाष सामंत

मूल्य : रू. १२५/-

# अनुक्रमणिका

| अ. नं. | लेख | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | महापुरूषांच्या विचारांचा 'वापर' केवळ स्वार्थासाठीच । | ५ |
| २. | कोटी कोटी कुळे उध्दारणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर | ६ |
| ३ | आंबेडकरी चळवळ इतिहास आणि पुढील काळ | ७ |
| ४ | डॉ. आंबेडकरांचे कृषिधोरण : शेतकरी आत्महत्या रोखणारे | ९ |
| ५ | गेल्या शंभर वर्षातील आंबेडकरी चळवळीचा पुर्वार्ध आणि उत्तरार्ध | ११ |
| ६ | आजची आंबेडकरी चळवळ आणि प्रतिगाम्यांचा आक्रोश | १५ |
| ७ | आंबेडकरी राजकारणाची दिशा व अपेक्षा | २० |
| ८ | आंबेडकरवाद : सैध्दांतिक व व्यावहारिक मर्यादा समता-क्रांतीपूरक विकासाच्या दिशेने | २२ |
| ९ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मविषयक तत्त्वज्ञान | ३२ |
| १० | सामाजिक समतेचा अंकुर फुलवावा | ३६ |
| ११ | कायद्याची शक्तीच देईल गुलामीतून मुक्ती | ३७ |
| १२ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पत्रकारिता | ३८ |
| १३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जलविषयक दूरदृष्टी | ४० |
| १४ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भारतीय स्त्रियांसाठी योगदान | ४२ |
| १५ | डॉ. भीमराव रामजी आंबेडकर : जीवनकार्य | ४४ |
| १६ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर : व्यक्तित्व आणि कर्तृत्व | ५२ |
| १७ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर : जीवन घटनाक्रम | ५६ |
| १८ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती : एक आत्मचिंतन | ५८ |
| १९ | 'गावगाडा' आणि दलितांवरील अत्याचार | ६२ |
| २० | क्रांतीची नवी दिशा म्हणजे काय | ६३ |
| २१ | ।लोकशाहीची वाटचाल : स्त्रियांचे प्रश्न आणि हक्क | ६८ |
| २२ | ग्रंथालये नकोत वाचनालये हवीत । | ७६ |
| २३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लोकशाहीविषयक विचार | ७७ |
| २४ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वातंत्र्याबद्दल व शैक्षणिक विचार | ७९ |
| २५ | रमाई बाबासाहेब आंबेडकर | ८० |
| २६ | डॉ. सविता बाबासाहेब आंबेडकर (माई आंबेडकर) | ८१ |
| २७ | बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर लिहिलेली पुस्तके | ८२ |
| २८ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनावर आणि कार्यावर लिहिली गेलेली पुस्तके | ८३ |
| २९ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेली पुस्तके | ८४ |
| ३० | डॉ. बाबासाहेब आंबेडकर (कविता) | ८५ |



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पत्रकारिता

**प्रा. डॉ. नितीश पांडुरंग सावंत**
प्रमुख, मराठी विभाग
जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर
मोबा. ९८९०९३९८१८

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता ही प्रामुख्याने लोकपत्रकारिता आहे. त्यांच्या या पत्रकारितेने लोकजागृती, लोकप्रबोधन, लोकशिक्षण, लोककल्याण आणि लोकविकासाच्या प्रक्रियेला गतिमान केले आणि सामाजिक परिवर्तनाच्या संदर्भात मराठी भाषिक पत्रकारितेचा सर्वसामान्य लोकांच्या हितसंबंधाशी कायमचा संबंध प्रस्थापित केला.

सर्व धर्माचा साकल्याने अभ्यास करून संपूर्ण मानव जातीला कोणता धर्म कल्याणकारक ठरू शकेल हे केवळ सांगून थांबणारा नव्हे, तर त्या दिशेने पाऊल टाकणारा एक कृतिशील धर्मज्ञ, अमानवी विचारांवर तुटून पडणारा आणि त्या विचारांचा जागी स्वातंत्र्य समता बंधुता आणि न्याय या मानवी मुल्यांची प्रत्यक्षात प्रस्थापना करणारा महान समाज क्रांतीकारक, भारताच्या आर्थिक विकासासाठी कोणत्या आर्थिक धोरणाचा स्वीकार करणे योग्य होईल हे सांगणारा नावाजलेला अर्थतज्ञ, राजकीय जीवनात 'एक व्यक्ती एक मत', 'एक मूल्य' आणि राजकीय लोकशाहीचे सामाजिक लोकशाहीत रूपांतर झाले पाहिजे हे स्वत: प्रमुख शिल्पकार असलेल्या संविधानाच्या माध्यमातून आग्रहाने प्रतीपादन करणारा राजकीय विचारवंत, प्रसंगी स्वत:च्या समाजहिताचा बळी देऊन देशहिताला प्राधान्य देणारा थोर राष्ट्रभक्त. भारताला आवश्यक शैक्षणिक धोरणाचा मूलत: विचार करून वंचितांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणारा थोर शिक्षणतज्ञ अशा विविध जिवनस्पर्शी पैलूंनी साकारलेले डॉ. आंबेडकरांचे विलोभनीय असे व्यक्तिमत्त्व होते. ज्या काळात डॉ. आंबेडकरांनी आपल्या पत्रकारितेला प्रारंभ केला त्या काळातील महत्त्वाच्या प्रश्नांची दखल त्यांनी त्यामध्ये घेतली आहे. "आमच्या या बहिष्कृत लोकांवर होत असलेल्या व पुढे होणाऱ्या अभ्यासावर उपाययोजना सुचविण्यास तसेच त्यांची भावी उन्नती व तिचे मार्ग यांच्या खऱ्या स्वरूपाची चर्चा करण्यास वर्तमानपत्रासारखी अन्य भूमीच नाही." स्वजनोध्दाराचे महत्कार्य करणारास योग्य पंथ दाखविण्यासाठी आपण 'मूकनायक' पत्र सुरू करीत आहोत असे त्यांनी 'मूकनायक' च्या पहिल्या अंकात सांगितले होते.

डॉ. बाबासाहेबांनी अंगिकारलेले हे कार्य लवकरच नाश पावले. १९२० साली पुढील अभ्यासासाठी डॉ. आंबेडकर इंग्लंडला गेले तेव्हा श्री. घोलप यांच्यावर "मूकनायक" ची जबाबदारी सोपवून ते गेले. मूकनायक च्या सुरूवातीच्या १२ अंकात बाबासाहेबांचे अग्रलेख होते. १९२३ साली ते बंद पडले. इंग्लंडहून परतल्यानंतर आणि विशेषत: १९२० मार्चला महाड येथे "कुलाब जिल्हा बहिष्कृत परिषदेचे पहिले अधिवेशन" झाल्यानंतर बाबासाहेबांनी चालविलेल्या बहिष्कृतांच्या चळवळीला खंबीर प्रचाराचा आधार देण्यासाठी एका वृत्तपत्राची त्यांना गरज भासू लागली याच गरजेतून "बहिष्कृत भारता"चा जन्म झाला. त्या काळची सामाजिक पार्श्वभूमी लक्षात घेता. बहिष्कृत भारत हे वृत्तपत्र सर्वात महत्त्वाचे ठरते.

कुठल्याही वृत्तपत्रात केवळ एखाद्या प्रश्नाचीच चर्चा होऊ नये, तर त्या प्रश्नाचा सांगोपांग म्हणजे सर्वार्थाने विचार व्हावा अशी डॉ. आंबेडकरांची पत्रकारितेची भूमिका होती. त्यांनी 'मराठी भाषिक वृत्तपत्रे आणि नियतकालिकांची जी विभागणी केली आहे त्या विभागणीप्रमाणे सामाजिक हिताला महत्त्व देताना त्यांनी 'पत्रकारिता ही एका जातीपुरती, वर्गापुरती अथवा समाजासाठीच असू नये असे म्हटले आहे. एका जातीचे हित तेच दुसऱ्या जातीचे हित आणि एका जातीचे अहित ते दुसऱ्या जातीचे अहित असा व्यापक समाज ही एक नौका आहे, या नौकेच्या नावाड्याकडून अथवा नौकेतील उतारूकडून जर नौकेतील इतरांचे नुकसान व्हावे म्हणून जर अहितकारक कृत्य घडलेच तर ते त्यालाही अहितकारक ठरते असा स्पष्ट इशारा देवून सर्वांचे सर्व जाती, धर्म पंथ आणि समाजाचे हित करणारी पत्रकारिता असावी; असा सर्व कल्याणकारी विचार त्यांनी व्यक्त केला आहे. आपली पत्रकारिता ही कुठल्याही प्रश्नाची केवळ चर्चा करणारी नाही, तर वैचारिक आणि सामाजिकदृष्ट्या देशातील सर्व समाजाच्या सर्वांगीण विकासासाठीच आहे असे मत प्रतिपादन केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या काळात आणि ज्या बिकट परिस्थितीत आपल्या पत्रकार जीवनाला प्रारंभ केला, त्या काळातील महत्त्वाच्या आणि सामाजिक हिताच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण

असलेल्या प्रश्नांची त्यांनी कटाक्षाने दखल घेतलेली आहे.

'बहिष्कृत भारत' च्या पहिल्या अंकातील पहिल्याच पृष्ठावर पहिल्या स्तंभात 'सुभोध वचने' आणि दुसऱ्या व तिसऱ्या स्तंभात 'आजकालचे प्रश्न' या त्यानंतर नियमित प्रसिद्ध केलेल्या सदराला अग्रस्थान दिलेले आढळते. यामधून त्यांच्या सहतिपरिवर्तनवादी लोकपत्रकारितेचे दर्शन घडते. भारतीय समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारी निर्भिड पत्रकारिता त्यांनी केली. आंबेडकरांनी सर्वधर्म समभावधारक आणि लोकशाहीतील पत्रकारितेचा एक आदर्श घालून दिलेला आहे.

" मानवी समाजाचे ऐक्य लोकपत्रकारितेला अभिप्रेत असते. लोकपत्रकारिता ही प्रज्ञा, करूणेची उपासक असते. ती विद्वेषी असू शकत नाही. सामाजिक समतावादी उच्च मानवी आदर्शाचे ती प्रतिक असते. "

**संदर्भ –**


१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बहिष्कृत भारत आणि मूकनायक – प्रकाशित – शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे भाग – १ (१९२०-१९३६),प्रकाशन– चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ प्रकाशन – सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मुंबई, मराठी ग्रंथ संग्रहालय

४) महाडचा मुक्तिसंग्राम आणि नानासाहेब टिपणीस, झुंबरलाल कांबळे, सुगावा प्रकाशन, पुणे.

५) चौदार तळे... एक मुक्तचिंतन – डॉ. माधव पोतदार – अनुबंध प्रकाशन, पुणे.


## भीम विचार



गुलामाला गुलामीची जाणीव
करून दिल्याशिवाय तो
बंड करून उठणार नाही.

राज्यघटनेची अंमलबजावणी
करणारे जर चांगले असतील
तर ही घटना जगातील सर्वोत्तम ठरेल
जर अंमलबजावणी करणारे नालायक
असतील तर हिच घटना अतिशय
वाईट ठरू शकेल...

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर**



## धर्मग्रंथाहुन ही आम्हा वंदनीय आहे संविधान

निर्मिला राष्ट्रगंथ भिमाने
मनुवादाशी झुंजुनी
केली रक्तविहीन क्रांती
हाती घेऊन लेखनी
त्या लेखनीचा असे
जगाला अभिमान
धर्मग्रंथाहुनी ही आम्हा वंदनीय आहे संविधान ।।१।।

याच संविधानाने दिले
स्वातंत्र्य माणसा-माणसाला
याच संविधानामुळे
एक केले भारत राष्ट्राला
ठेवण्या स्वातंत्र्य चिरायु
जान करू कुरबान
धर्मग्रंथाहुन ही आम्हा वंदनीय आहे संविधान ।।२।।

याच देशातील शुद्र
राष्ट्रपती झाला असता का?
देशातील बामण
मुख्यमंत्री झाला असता का?
स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता
हेच आम्हा वरदान
धर्मग्रंथाहुन ही आम्हा वंदनीय आहे संविधान ।३।।

**किशोर वाघमारे, जत**